गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## क्रांतीदिनी स्वातंत्र्य सैनिकांसाठी कदंबा बस सेवेची व्यवस्था

ता. 12 जून 2019

22 ज्येष्ठ 1941

स्वातंत्र्य सैनिकांना पणजी येथील आझाद मैदानावर सकाळी 8.45 वाजता होणाऱ्या क्रांतीदिन कार्यक्रमास हजर राहण्यासाठी गृह खात्याने कदंब बसेसची व्यवस्था केली आहे. 18 जून 2019 रोजी म्हापसा येथील हुतात्मा चौकाजवळ सकाळी 7.45 वाजता जीए-03-एक्स-0283 या क्रमाकाची बस चालक श्री. डॉमनिक डिसौझा बॅच क्रमांक 11214 स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन पणजीला येईल.

आझाद मैदानावरील कार्यक्रम संपल्यानंतर पणजी फेरी धक्क्याजवळ पार्क करून ठेवलेल्या जीए-03-एक्स-0283 आणि जीए-03 एक्स-0551 क्रमाकाच्या बसेस स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन आग्वाद किल्ल्याकडे जाईल आणि आग्वाद किल्ल्यावरील कार्यक्रम संपल्यानंतर दोन्ही बसेस स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन पर्वरी येथील आझाद भवनाकडे जाणार.

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/325